पुढारी

# ‘केआयटी’मध्ये २४, २५ एप्रिलला पायोनिअर स्पर्धा

## दोन हजार विद्यार्थी; राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय, इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन स्टुडंट चॅप्टर अंतर्गत विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीला वाव देणाऱ्या रौप्यमहोत्सवी पायोनिअर राष्ट्रीय तांत्रिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केआयटीचे संचालक डॉ. एम. एम. मुजुमदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी (दि. २४) सकाळी नऊ वाजता केआयटी येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व मर्सिडीज बेन्झचे जनरल मॅनेजर डॉ. उमेश देशपांडे यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन होणार आहे. प्रकल्प स्पर्धेत पाच गटात विभागवार स्पर्धक विद्यार्थी तांत्रिक विषयावरील प्रकल्प वर्किंग मॉडेल्स, पोस्टर्स आणि प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करणार आहेत. दि.२५ रोजी शार्क टँक -स्टार्टअप बिजनेस आयडिया, इन्व्हिजन- क्वीज अँड टेक्निकल प्रेजेंटेशन, निर्मिती- टेक्निकल डॉक्युमेंटरी, डाईव्ह इन सर्किट - बिल्ड द सर्किट , मल्टिवर्स ऑफ कोडिंग - कोडिंग अँड प्रोग्रॅमिंग, बिग आयडिया - प्रेजेंटेशन अँड आयडिया पिचिंग आणि कॅडवेंजर्स - क्वीज अँड इंजि. ड्रॉईंग अशा स्पर्धा होणार आहेत.

स्पर्धेचा समारोप, पारितोषिक वितरण इन्फोसाई कन्सल्टिंग, बंगळूरचे उपाध्यक्ष मनोज बी. एम. यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. विजेत्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रा. अभिजित पाटील, समन्वयक डॉ. जितेंद्र भाट परिश्रम घेत आहेत. यावेळी केआयटीचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, साजिद हुदली, दीपक चौगुले, डॉ. विलास कार्जिन्नी उपस्थित होते.

सकाळ



जलदिंडी दरम्यान शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नदीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले.



पिरळ : येथे भोगावती नदीत गुरुवारी झेंडा दाखवून जलदिंडीची सुरुवात करताना जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, 'सकाळ'चे संपादक संचालक श्रीराम पवार, शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या आसावरी जाधव, उदय गायकवाड आदी.

तरूण भारत

# आर. एस. बेरी जन्मशताब्दी निमित विविध कार्यक्रम

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापुरातील प्रथम व ख्यातनाम आर्किटेक्ट व इंजीनिअर आर. एस्. बेरी यांची जन्मशताब्दी २० ऑगस्ट २०२२ रोजी होत आहे. या वर्षाचे निमित्त साधून विविध संस्थेच्यावतीने विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. अशी माहीती संस्थामार्फत देण्यात आली आहे.

कोल्हापुरातील इंडियन इंस्टीटयुट ऑफ आर्किटेक्टस्, कोल्हापूर सेंटर, असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् व इंजिनिअर्स, इंस्टीटयुट ऑफ इंडियन इंटिरीअर डिझाईनर्स, कोल्हापूर चॅप्टवर, दि इंस्टीटयुशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), कोल्हापूर लोकल सेंटर, डिपार्टमेंट ऑफ् टेक्नॉ लॉजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डेक्कन इंस्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, या सर्व संस्थानी एकत्र येवून या कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरवले आहे.

याचा प्रथम टप्पा म्हणून महाराष्ट्रातील वास्तु विशारद, आर्किटेक्चर व इंटेरियर डिझाइन कॉलेजचे विद्यार्थी, लघुपट निर्माति व कलाकार या सर्वांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळावी, म्हणून चार विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. यामध्ये पहिल्या तीन स्पर्धा २५ एप्रिल ते २५ जूनला तर चौथी स्पर्धा जुलैमध्यें घेतली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

१९ ऑगस्ट रोजी डिपार्टमेंट ऑफ् टेक्नोलोजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, इंडियन इंस्टीटयुट ऑफ आर्किटेक्टस्, कोल्हापूर सेंटर आणि सर्व संस्था यांच्या तर्फे पूर्ण एक दिवसीय सेमिनारचे आयोजन केले आहे.

यासाठी आर. एस्. बेरी यांचे दोन्ही चिरंजीव प्रमोद व शिरीष यांचे सहकार्य मिळणार असल्याचे सांगण्यात आले.